होतां अविद्यानिवर्तन । उरे न अणुमात्र नानात्व ज्ञान ॥
चुके तयाचें जन्म मरण । एकत्व विज्ञान या मूळ ॥ ३३ ॥
धरी जो अत्यल्प भेददृष्टी । पडेल जन्म मरणाचे कष्टीं ॥
तयास विनाश आणि सृष्टी । लागली पाठीं सदोदित ॥३४॥
श्रेय हाचि जीचा विषय । तीच ती विद्या निःसंषय ॥
जीचा विषय केवळ प्रेय । अविद्या नामधेय तियेस ॥३५॥
मृत्यू हेंच मोठें भवभय । तयापासून व्हावया निर्भय ॥
घट्ट धरा गुरु चरणद्वय । देतील अद्वय बुद्धीते ॥ ३६ ॥
जेथें द्वितीया अभिनिवेश । तेथेच कां या भयासीं प्रवेश ॥
म्हणोनि जेथें न भय लवलेश । तें निर्विशेष पद सेवा ॥ ३७ ॥
शुद्ध प्रेम मलयागर । लावा तयाचिया भाळावर ॥
नेसवा भावार्थ पीतांबर । दावील विश्वंभर निजभक्तां ॥ ३८ ॥
दृढ श्रद्धेचें सिंहासन । अष्टभावमंडित पूर्ण ॥
आनंदाश्रूजलें स्नपन । सद्यः प्रसन्न प्रकटेल ॥ ३९ ॥
भक्ति मेखळा कटीभोंती । बांधोनि आकळा तयाप्रती ॥
सर्वस्वाचें निंबलोण प्रीति । करा मग आरती ओंवाळा ॥ ४० ॥
कोण्याही कार्याचा प्रविलय । होई धरूनि अस्तित्वाश्रय ॥
खड्यानें घट फोडिला जाय । निवृत्त होय आकारची ॥ ४१ ॥
घटास्तित्वांश लवमात्रही । नाहीं ऐसा होत नाहीं ॥
फुटक्या खापऱ्यांचियाही ठायीं । अनुवृत्ती होई घटाची ॥ ४२ ॥
म्हणून कार्याचें जें प्रविलापन । तें अस्तित्वनिष्ठ चिरंतन ॥
म्हणून कोणाचेंही देहावसान । नव्हे पर्यवसान शून्यत्वीं ॥ ४३ ॥
कार्य न कारणाव्यतिरिक्त । झालें व्यक्त जरी अव्यक्त ॥
तरी तें सदैव सदन्वित । हे तो सुप्रतीत सर्वत्र ॥ ४४ ॥

सूक्ष्मतेचिया न्यूनाधिक्याची । परंपरा ही दर्शवी हेंची ॥
स्थूल कार्य विलयीं साची । सूक्ष्मकारणची अवशिष्ट ॥ ४५ ॥
तयाचा ही विलय होतां । त्याहून सूक्ष्म अवशिष्ट राहतां ॥
सकलेंद्रिय मन बुद्धि ग्राहकता । पावे विकलता ग्रहणार्थी ॥ ४६ ॥
तात्पर्य बुद्धि ही जेथें ठके । तेथेंचि मूर्त अमूर्तीं ठाके ॥
परी त्याचा न सद्भाव झाके । सन्मात्र झळके सर्वत्र ॥ ४७ ॥
बुद्धि कामास देई आश्रय । म्हणोनि हिचा होतां विलय ॥
तात्काळ होई आत्मोदय । पडे अक्षय पद ठायीं ॥ ४८ ॥
अविद्या माया काम कर्म । हेच मुख्य मृत्यूचे धर्म ॥
होतां या सर्वांचा उपरम । होई उपशम बंधाचा ॥ ४९ ॥
होतां सर्व बंधननाश । प्रकटे आत्मा अप्रयास ॥
जैसा मेघ जाण्याचा अवकाश । स्वयंप्रकाश चमके रवी ॥ ५० ॥
शरीर मी, हें माझें धन । या नांव दृढ देहाभिमान ॥
हेंचि हृदयग्रंथि निबंधन ॥ दुःखाधिवेशन मायेचें ॥ ५१ ॥
जरी हा देह एकदां निमाला । कर्मबीजें देहांतर लाधला ॥
तें बीज निःशेष जाळावयाला । चुकला कीं आला पुनर्जन्म ॥ ५२ ॥
पुनश्च बीजांचे वृक्ष होती । वासनाबीजें देहांतर प्राप्ति ॥
ऐसें हें चक्र अव्याहत गती । वासना निमती तोंवरी ॥ ५३ ॥
कामांचा जैं समूळ विनाश । तैंच हृदयग्रंथिनिरास ॥
तैंच अमर मर्त्य मनुष्य । हाच उपदेश वेदांतीं ॥ ५४ ॥
धर्माधर्मविहित स्थिती । जिये नाम विरजा वदती ॥
अविद्या काम निर्मूलन कर्ती । जेथें न लव गति मृत्यूतें ॥ ५५ ॥
वासनांचा परित्याग । तोच ब्रह्मानंदाचा योग ॥
न्निमलेख्या त्या शब्द-प्रयोग । वाचाविनियोग अनिर्वाच्या ॥ ५६ ॥

झालिया परब्रह्म संवित्ति । तीच सकलाभिष्ट निवृत्ति ॥
तीच मनेप्सित इष्टप्राप्ति । हें श्रुतिस्मृति प्रामाण्य ॥५७॥

'ब्रह्मविदाप्नोति परं' । हेंच ब्रह्मानंदसाध्य चरम ॥
याहून अन्य काय परम । "तरति शोकमात्मवित्" ॥ ५८ ॥

संसारार्णव तमोमूळ । पावावया परकूल ॥
ब्रह्मज्ञानचि उपाय निखळ । साधन सकळ माझीचें ॥५९॥

पूर्ण श्रद्धा आणि धीर । हेचि मूर्त उमामहेश्वर ॥
मस्तकीं नसतां यत्कृपाकर । दिसे न विश्वंभर हृदयस्थ ॥६०॥

वदले साईनाथ गुरुवर्य । उद्धार ज्यांचे अमोघवीर्य ॥
पाहिजे निष्ठेचें अल्प धैर्य । महदैश्वर्य पावाल ॥६१॥

असन्मात्र अवघें दृश्य । हें तों मानणें येतें अवश्य ॥
स्वप्नदर्शन घ्या प्रत्यक्ष । सर्वही अदृश्य प्रबोधीं ६२ ॥

येथवरी बुद्धीची धांव । येथवरीच आत्म्याशीं सद्भाव ॥
परी जेथें न सदसता ठाव । तो तत्त्वभाव तो आत्मा ॥ ६३ ॥

सदसदादि प्रत्ययवर्जित । अलिंग सर्व विशेषरहित ॥
तेंच शब्द शब्दांतर वर्णित । तेंच सर्वगत गुरुरूप ॥ ६४ ॥

आत्मा सर्व विशेष रहित । जरा जन्म मरणातीत ॥
हा पुराण आणि शाश्वत । अपक्षय वर्जित सर्वदा ॥ ६५ ॥

हा नित्य अज पुरातन । सर्वगत जैसें गगन ॥
अनादि आणि अविच्छिन्न । वृद्धि शून्य अविक्रिय ॥ ६६ ॥

जें अशब्द आणि अरूप । अनादि अनंत आणि अमूप ॥
अव्यय अगंध अरस अलेप । कवणातें स्वरूप वर्णवेल ॥ ६७ ॥

---

१ तट.

परी दिसला ऐसिया निर्गुणा ॥ नेणतपणें जरी नेणा ॥
ज्ञानें दवडा हा अज्ञानपणा । कधींही न म्हणा शून्य तया ॥ ६८ ॥

काय ती परमहंस थिती । श्रीसाईची निज संपत्ती ॥
काळें चोरिली होतोहाती । दिसेल मागुती ती काय ॥ ६९ ॥

धनसुतदारासक्त भक्त । राहूं द्या कीं यांची मात ॥
दर्शना येत योगी विरक्त । राहत आसक्त पदकमलीं ॥७०॥

काम कर्म बंध विमुक्त । सर्वैषणा विनिर्मुक्त ॥
देह गेहादिकीं विरक्त । जगीं भक्त तो धन्य ॥ ७१ ॥

साई जयाचा दृष्टि विषय । तया वस्त्वंतर दिसेल काय ॥
दृश्यमात्रीं साई शिवाय । रिकामा ठाय दिसेना ॥ ७२ ॥

वदनीं श्री साईचें नाम । हृदयीं श्रीसाईचें प्रेम ॥
तया नित्य आराम क्षेम । रक्षी स्वयमेव साई त्या ॥ ७३ ॥

श्रवणाचीही तीच गत । शब्द नाहीं साईव्यतिरिक्त ॥
घ्राणीं साई परिमळ भरत । रसना पवळत साईरसें ॥ ७४ ॥

सुखाचें जें सोलीव सुख । काय साईचें सुहास्य मुख ॥
धन्य भाग्याचा तो देख । जेणे तें शब्द पीयूख सेविलें ॥ ७५ ॥

कल्याणाचें निधान । सुख शांतीचें जन्मस्थान ॥
सदसद्विवेक वैराग्यवान । सदा सावधान अंतरीं ॥ ७६ ॥

गोरसेंसी वत्स धालें । तरी न मायेपासून हालें ॥
तैसें मन हें पाहिजे बांधिलें । दावणीं दाविलें गुरुपायीं ॥ ७७ ॥

व्हावया गुरुकृपानुरागा । वंदा तत्पद कमलपरागा ॥
केलिया हितबोधा जागा । अनुभव घ्यागा पदोपदीं ॥ ७८ ॥

यथेच्छ रमता इंद्रियार्थीं । अंतरीं ठेवा साई प्रीती ॥
तोचि काया येईल अंतीं । स्वार्थीं परमार्थीं उभयत्र ॥ ७९ ॥

मंत्रसिद्ध मांत्रिक अंजन । दावी पायाळूस भूमिगत धन ॥
तैसेंच गुरुपदरज धूसर नयन । ज्ञान विज्ञान पावती ॥ ८० ॥

सिद्धांचीं जीं जीं लक्षणें । साधकांचीं तीं तींच साधनें ॥
साध्य कराया दीर्घप्रयत्नें ॥ अभ्यास सूज्ञें करावा ॥ ८१ ॥

दुग्धापोटीं आहे घृत ॥ परी न करितां तें आम्लयुत ॥
नाहीं तक्र ना नवनीत । तेही अपेक्षित संस्कारा ॥ ८२ ॥

तक्र घुसळल्या विरहीत । प्राप्त होईना नवनीत ॥
तेही न करितां अग्निसंयुक्त । स्वादिष्ट घृत लाभेना ॥ ८३ ॥

पाहिजे संस्कार बलवत्तता । पूर्वाभ्यासें बुद्धिमत्ता ॥
अभ्यासावीण न चित्त शुद्धता । तिजवीण दुर्गमता ज्ञानास ॥ ८४ ॥

व्हावी निर्मळ चित्तवृत्ती । तरीच होईल आत्मप्राप्ती ॥
हाता नये जों ती स्वरूप स्थिति । भगवद्भक्ति सोडूं नये ॥ ८५ ॥

लागे भगवद्भक्तीचा पाया । मंदिर आत्मज्ञानाचें उठाया ॥
चारी मुक्तीचे कळस झळकाया । ध्वजा फडकाया विरक्तीची ॥ ८६ ॥

रात्रंदिन कर्दमीं लोळती । श्वान सूकरें विष्टा भक्षितीं ॥
विषयभोग तींही भोगिती । तीच का महती नरदेहीं ॥ ८७ ॥

होय जेणें चित्त शुद्धि । जेणें अखंड ब्रह्मसिद्धि ॥
तें स्वधर्माचरण आधीं । तप हें साधी नरदेहें ॥ ८८ ॥

साधुसेवा मुक्तीचें घर । स्त्रैणसंग नरकद्वार ॥
हे पूज्य वृद्धजनोद्गार । विचारार्ह सर्वथा ॥ ८९ ॥

सदा सदाचार संपन्न । देह निर्वाहापुरतें अन्न ॥
गृहदारादि स्पृहाशून्य । ऐसा जो धन्य तो साधू ॥९०॥

जे जे अनिमेष चिंतिती साई । प्रचीतीची पहा नवलाई ॥
स्वयें साई तयांस ध्याई । होऊन उतराई तयांचा ॥९१॥

धन्य नामस्मरण महती । गुरूही भक्तस्मरण करिती ॥
ध्याता प्रवेशे ध्येयस्थिति । पूर्ण विस्मृति परस्परा ॥९२॥

तुम्ही जाणा तुमची करणी । मज तों अहर्निश तुमची घाकणी ॥
ऐसी बाबांची प्रेमळ वाणी । असेल स्मरणीं बहुतांच्या ॥९३॥

नलगे आम्हां ज्ञानकथा । पुरे हा एक साईचा गाथा ॥
कितीही पापें असोत माथा । संकटीं त्राता हा आम्हा ॥९४॥

जरी न करवतीं पारायणें । तरी यांतील गुरुभक्ति प्रकरणें ॥
श्रोतां कीजे हृदयाभरणें । नित्य श्रवणें नेमानें ॥९५॥

दिवसाच्या कोणत्याही प्रहरीं । वाचील नित्य हें चरित्र जरी ॥
निज गुरुराज सह श्रीहरी । भेटेल निर्धारी भाविकां ॥९६॥

अखंड लक्ष्मी नांदेल घरीं । वाचितील जे निरंतरी ॥
निदान जो एक सप्ताह करी । दरिद्र दूरी तयाचें ॥९७॥

हें मी वदतों ऐसें न म्हणा । तेणें संशय घेरील मना ॥
साईच वदवी माझिये वदना । क्लिष्ट कल्पना सोडावी ॥९८॥

तो हा सकळ गुणखाणी । साई निजभक्त कैवल्यदानी ॥
कथा जयाची कलिमलहरणी । श्रोतां श्रवणीं परिसिजे ॥९९॥

ऐसिया संत कथांपुढें । स्वर्ग सौख्य तें काय बापुडें ॥
कोण धुंकून माहीकी तिकडे । टाकून रोकडें सत्कथन ॥१००॥

सुख दुःख हे तो चित्तविकार । सत्संग सर्वदा निर्विकार ॥
करी चित चैतन्याकार । सुखदुःखा थार देईना ॥ १०१ ॥

जे सुख विरक्ता एकांतीं । कीं जें भक्तांकरितां भक्ति ॥
असो इंद्र कीं चक्रवर्ती । न मिळे कल्पांतीं तयांना ॥ १०२ ॥

प्रारब्धभोग बळवत्तर । बुद्धि उपजे कर्मानुसार ॥
उपजो परी हे नेमनेमांतर । भक्त तत्पर टाळील ॥ १०३ ॥

करा कीं भगीरथ उद्योग । चुकेना प्रारब्धकर्मभोग ॥
अवश्य भावित्वाचा योग । तयाचा वियोग अशक्य ॥ १०४ ॥

जैसें य दुःख अवांछित । सुखही तैसेंच अकल्पित ॥
देहप्रारब्धाची ही गत । आधींच अवगत संतांस ॥ १०५ ॥

अखंड तन्नामावर्तन । हेंचि आम्हा व्रत तप दान ॥
वेळोवेळीं शिर्डी प्रयाण । हेंचि तीर्थाटण आमुचें ॥ १०६ ॥

साईसाईति नामस्मरण । याच मंत्राचें अनुष्ठान ॥
हेंच ध्यान हेंच पुरश्चरण । अनन्य शरण या जावें ॥ १०७ ॥

निष्कपट प्रेमानुसंधान । इतुकेंच खरें तयाचें पूजन ॥
मग अंतरीं घ्या अनुभवून । अतर्क्य विंदान तयाचें ॥ १०८ ॥

पुर आतां हें गुऱ्हाळ । आम्हा पाहिजे सत्वर गूळ ॥
पूर्व सूचित कथा रसाळ । श्रवणार्थ सकळ उत्सुक ॥ १०९ ॥

ऐसा श्रोतवृंदांचा भाव । जाणूनि सूचित कथा नवलाव ॥
आवरिला हा ग्रंथ गौरव । अवधानसौष्ठव राखाया ॥ ११० ॥

काव्य पदबंध व्युत्पत्ती । नेणे मी पामर मंदमती ॥
करधृत लखणी धरोनी हातीं । साईच लिहिविती तें लिहितों ॥ १११ ॥

साई नसता बुद्धिदाता । तरी मी कोण चरित्र लिहिता ॥
त्याची कथा तोचि वदविता । आणीक लिहिवितांही तोच ॥११२॥

असो आतां कथानुसंधान । चावडी हंडी प्रसाद कथन ॥
करूं म्हणून दिधलें आश्वासन । कथा निरूपण तें परिसा ॥ ११३ ॥

आणीकही तदंगभूत । अथवा दुजिया कथा ज्या स्मरत ॥
त्या त्या सांगूं श्रोतयांप्रत । त्या सावचित्त परिसाव्या ॥ ११४ ॥

धन्य साई कथांचा नवलाव । धन्य धन्य श्रवण प्रभाव ॥
मननें प्रकटे निजस्वभाव । थोरावे सद्भाव साईपदीं ॥ ११५ ॥

आतां आधीं चावडी वर्णन । समारंभाचें करूं दिग्दर्शन ॥
बाबा करीत एकांतरा शयन । चावडी लागून नियमानें ॥ ११६ ॥

एक रात्र मशिदींत । दुजी क्रमीत चावडीप्रत ॥
ऐसा हा क्रम बाबांचा सतत । समाधीपर्यंत चालला ॥ ११७ ॥

पुढें एकूणीससें नऊ सन । दहा डिसेंबर तें पासून ॥
चावडीमाजी साईचें अर्चन । भजन पूजन हों लागे ॥ ११८ ॥

तो चावडीचा समारंभ । यथामती करूं आरंभ ॥
करील साई कृपासंरंभ । तडीस विश्वंभर नेईल ॥ ११९ ॥

चावडीची येतां रात । भजन मंडळी मशिदी येत ॥
भजन दोन प्रहरपर्यंत । मंडपांत चालतसे ॥ १२० ॥

मागें रथ शोभायमान । दक्षिणांगीं तुळसी वृंदावन ॥
सन्मुख बाबा स्थानापन्न । मध्यें भक्तजन भजनार्थी ॥ १२१ ॥

हरिभजनीं जया आदर । ऐसे भक्त नारी नर ॥
सभामंडपीं येऊनि सत्वर । भजनतत्पर ठाकती ॥ १२२ ॥

कोणी करीं घेऊनि टाळ । कोणी चिपळीया करताळ ॥
कोणी मृदंग खंजिरी घोळ । भजन कल्लोळ मांडीत ॥ १२३ ॥

साई समर्थ चुंबक मणी । निज सत्तेचिया आकर्षणी ॥
जडलोह भक्तां लावूनि ओढणी । नकळत चरणीं ओढीत ॥ १२४ ॥

इलकारे दिवट्या पाजळती अंगणीं । तेथेंच पालखी शृंगारिती कोणी॥
द्वारीं सज्ज वेत्रपाणी । करीत ललकारणी जयघोष ॥ १२५ ॥

चव्हाट्यावरी मखरें तोरणें । वरी अंबरीं झळकतीं निशाणें ॥
नूतन वस्त्रें दिव्याभरणें । बालकें भूषणीं शृंगारिलीं ॥ १२६ ॥

मशिदीचिया परिसरीं । उजळत दीपांच्या बहु हारी ॥
वारू शामकर्ण अगण द्वारीं । पूर्ण शृंगारीं विराजत ॥ १२७ ॥

इतक्यांत तात्या पाटील येत । घेऊनिया मंडळीसमवेत ॥
बावापाशीं येऊनि बैसत । निघाया उद्यत बाबांसवें ॥ १२८ ॥

बाबा जरी तयार असत । तात्या पाटील येईपर्यंत ॥
जागचे जागीं बैसूनि राहत । वाट पाहत तात्यांची ॥ १२९ ॥

जेव्हां खाकेंत घालूनि हात । तात्या पाटील बाबांस उठवित ॥
तेव्हांच बाबा निघाया सजत । चावडीप्रत तेथुनी ॥ १३० ॥

तात्या बाबांस म्हणत मामा । ऐसा परस्पर तयांचा प्रेमा ॥
ऐशा तयांच्या आप्त धर्मा । नाहीं उपमा द्यावया ॥ १३१

अंगांत नित्याची कफनी । सटका अपुला बगलेस मारोनि ॥
तमाखू आणि चिलीम घेउनी । फडका टाकुनि स्कंधावर ॥ १३२ ॥

बाबा जंव ऐसे तयार । घालिती तात्या अंगावर ॥
जरीकाठी शेला सुंदर । करिती शिरावर सारिखा ॥ १३३ ॥

बाबा मग पाटील भिंती तळीं । असे पडली सर्पणाची मोळी ॥
तदग्रीं दक्षिण पादांगुळीं । हालवीत ते स्थळीं क्षणभर ॥ १३४ ॥

लगेच तेथील जळती जोत । स्वयें मारूनि दक्षिण हात ॥
आधीं साई बुझावीत । मागून निघत चावडीतें ॥ १३५ ॥

साई निघतां जावया । वाद्यें लागत वाजावया ॥
नळे चंद्रजोती हवया । प्रकाशती दिवटिया चौपासीं ॥ १३६ ॥

कोणी वर्तुल धनुष्याकृती । शिंगें कर्णे तुताऱ्या फुंकिती ॥
कोणी तास झांज वाजविती । नाहीं मिती टाळकरियां ॥ १३७ ॥

मृदंग वीणा झणत्कारीं । साईनामाचिया गजरीं ॥
भजन समवेत हारोहारी । प्रेमें नरनारी चालत ॥ १३८ ॥

दिंडी पताका झेलित । कोणी गरुड टके मिरवित ॥
नाचत उडत भजन करित । निघन मग समस्त जावया ॥ १३९ ॥

अति आनंद सकल लोकां । घेऊनि निघती दिंड्या पताका ॥
ताश तुतारे कर्ण्यांचा दणका । जयकार थयकार वारूचा ॥ १४० ॥

ऐसिया वाजंतरांचे गजरीं । मशीदींतून निघे स्वारी ॥
भालदार देत ललकारी । पायरीवरी बाबा जों ॥ १४१ ॥

टाळ झांज मृदंग मेळीं । कोणी वीणा कोणी चिपळी ॥
भजन करीत भक्तमंडळी । सुख समेळीं तें स्थानीं ॥ १४२ ॥

टके पताका घेउनि करीं । भक्त चालती आनंदनिर्भरीं ॥
दुबाजू दोन चवरधरी । पंखे करीं वीजिती ॥ १४३ ॥

शेले दुशेले एकेरी करिती । पायघड्या मार्गात अंथरिती ॥
बाबांस हातीं धरोनि चालविती । चवऱ्या ढाळिती तयांवरी ॥१४४॥

तात्याचा नाम हस्त धरी । म्हाळसापती दक्षिण करीं ॥
बापूसाहेब छत्र शिरीं । चालली स्वारी चावडीसी ॥ १४५ ॥
अघाडी घोडा तो ताम्रवर्ण । नाम जयाचें शामकर्ण ॥
घुंगुरें झणत्कारिती चरण । सर्वाभरण मंडित जो ॥ १४६ ॥
वेत्रपाणी पुढें चालत । साईनामाचा ललकार करित ॥
छत्रधारी छत्र धरित । चवऱ्या वारित चवरधर ॥ १४७ ॥
ताशे वाजंत्रे वाजत । भक्त जयजयकारें गर्जत ॥
ऐस भक्तसंभार चालत । प्रेमें पुकारत भालदार ॥ १४८ ॥
हरिनामाचा एकचि गजर । टाळ झांज मृदंग सुस्वर ॥
सर्वे तालावर भक्त संभार । गर्जत ललकारत चालती ॥ १४९ ॥
ऐसा भजनी भक्त संभार । होऊनिया आनंद निर्भर ॥
वाटेनें साईचा जयजयकार । करीत चव्हाटयावर ठाकत तैं ॥ १५० ॥
टाळ झांज ढोल घोळ । वाद्यें वाजती अति तुंबळ ॥
साईनामाचा एकचि कल्लोळ । भजन प्रेमळ मौजेचें ॥ १५१ ॥
सर्वे चालती नारी नर । सर्व भजनानंदीं निर्भर ॥
करीत साईनामाचा गजर । नादें अंबर कोंदाटे ॥ १५२ ॥
गगन गर्जे वाजंतरीं । प्रेक्षक समुदाय प्रसन्न अंतरीं ॥
ऐसी प्रेक्षणीय चावडीची स्वारी । शोभा साजिरी अनुपम्य ॥१५३॥
अरुण संध्यारागें नभा । जैसी तप्तकांचन प्रभा ॥
तैसी जयाची श्रीमुखशोभा । सन्मुख जैं उभा चावडीच्या ॥ १५४ ॥
ते समयींची ती मुखशोभा । पसरली जणुं बालारुण प्रभा ॥
केवळ चैतन्याचा गाभा । कोण त्या लाभा टाळील ॥ १५५ ॥

१ बापूसाहेब जोग.

धन्य ते समर्थांचें दर्शन । मुखप्रभा आरक्तवर्ण ॥
उत्तराभिमुख एकाग्र मन । करी पाचारण जणुं कोणा ॥ १५६ ॥

ताशे वाजंत्र्यांचा गजर । महाराज आनंद निर्भर ॥
करिती अधोर्ध्व दक्षिणकर । वरचेवर तेधवां ॥ १५७ ॥

रौप्य ताटीं कुसुमनिकर । घेऊन दीक्षित[1] भक्तप्रवर ॥
पुष्पवृष्टी सर्वांगावर । करीत वरचेवर ते समर्थीं ॥ १५८ ॥

साईचिया मस्तकावरती । गुलाब पुष्पें गुलाल मिश्रिती ॥
काकासाहेब उधळत राहती । प्रेमभक्ती संयुक्त ॥ १५९ ॥

ऐशा जंव त्या पुष्पकळिका । गुलालयुक्त उधळिती काका ॥
तास झांज टाळांचा ठोका । एकचि कडाका वाद्यांचा ॥ १६० ॥

ग्रामलोक बाबांचे भक्त । दर्शना येती प्रीतीयुक्त ॥
मुखचर्या अरुण रक्त । अभिनवसुव्यक्त तेवेळीं ॥ १६१ ॥

पाहोनिया तो तेजविलास । प्रेक्षकनेत्र पावती विकास ॥
प्रेमळां मना होई उल्हास । भवसायास निवृत्ती ॥ १६२ ॥

अहा तें दिव्य तेज अद्भुत । शोभे जैसा बाल भास्वत[2] ॥
सन्मुख ताशे कहाळा गर्जत । उभे राहत बहुसाल ॥ १६३ ॥

करूनि सतत खालीवर । हेलकावीत दक्षिण कर ॥
उदङ्मुख एका स्थळावर । अर्ध प्रहरपर्यंत ॥ १६४ ॥

पीतवर्ण केतकी गाभा । किंचित आरक्त मुखप्रभा ॥
जिव्हा न वर्णूं शकें ती शोभा । नेत्रेंच लाभा सेवावें ॥ १६५ ॥

तितक्यांत जेव्हां का म्हाळसापती । संचार होऊनि नाचूं लागती ॥
तेव्हां ही बाबांची एकाग्र स्थिती । पाहतां चित्तीं आश्चर्य ॥ १६६ ॥

---

१ काकासाहेब दीक्षित २ सूर्य

दक्षिणांगीं उभा भगत । अंचल बाबांचा करें धरीत ॥
वामांगीं तात्या कोते चालत । घेऊनि हस्तांत कंदील ॥ १६७ ॥

काय मौजेचा तो उत्सव । भक्ति प्रेमाचें तें गौरव ॥
पाहावया तयाचा नवलाव । अमीर उमराव एकवटती ॥ १६८ ॥

निजतेजें धवधवीत । मुखचंद्र सोज्वळ आरक्त ॥
अवर्णनीय शोभा शोभत ॥ स्वानंद पूरित जननयन ॥ १६९ ॥

हळू हळू चालती वाटे । भक्त समुदाय दुबाजू थाटे ॥
अनिवार भक्तिप्रेम दाटे । स्वानंद कोंदाटे घनदाट ॥ १७० ॥

आतां पुढें ऐसा सोहळा । कोणीही पाहूं न सके डोळां ॥
गेले ते दिवस आणि ती वेळा ॥ मनासी विरंगुळा स्मरणेच॥१७१॥

वाजती वाजंत्रीं अपार । मार्गीं करिती जयजयकार ॥
नेउनि चावडीसी आसनावर । दिव्योपचार अर्पिती ॥ १७२ ॥

वरी बांधीत शुभ्र वितान । हंडया झुंबरें शोभायमान ॥
आरसां प्रकाश परावर्तन । दैदीप्यमान देखावा ॥ १७३ ॥

भक्त मंडळी सर्व मिळून । चावडीतें जाती जमून ॥
तात्याबा मग घालिती आसन । बाबांस धरून बैसवित ॥ १७४ ॥

ऐसें तें तयार वरासन । पाठीसीं लोडाचें ओठंगण ॥
बाबा होतांच स्थानापन्न । अंगरखा परिधान करवीत ॥ १७५ ॥

घालीत अंगावर दिव्यांबरें । पूजा करीत हर्षनिर्भरें ॥
करीत आरत्या महागजरें । हारतुरे चढवीत ॥ १७६ ॥

सुगंध चंदन चर्चून । करित साईस करोद्वर्तन ॥
उंच वस्त्रीं अलंकारून । मुकुट घालून पाहत ॥ १७७ ॥

---

१ समाधान. २ छत.

कधीं सुवर्ण मुकुट साजिरा । कधीं शिरपेची मंदिल गहिरा ॥
झळके जयावरी कलगी तुरा । कंठी हिरा माणिकें ॥ १७८ ॥

धवल मुक्ताफळांच्या माळा । घालिती मग तयांच्या गळां ॥
दिवावत्तीच्या योगे झळाळा । तेजें आगळा पेहराव ॥ १७९ ॥

सुगंध कस्तूरीरचित काळी । ऊर्ध्वरेषा रेखिती निढळीं ॥
कृष्ण तिलक लाविती भाळीं । वैष्णव कुळीं जेणें परी ॥ १८० ॥

तो जांभळा मखमाली भरजरी । अंगरखा दों खांद्यावरी ॥
हळूच मागून वरचेवरी ॥ सरकतां सावरीत दोबाजू ॥ १८१ ॥

तैसेंच डोईस मुगुटाभरण । अथवा मंदील पालटून ॥
वरिचे वरीच धरीत झेलून । हळूच मागून नकळत ॥ १८२ ॥

हो का मुकूट अथवा मंदिल । स्पर्श होतां फेकून देतील ॥
होती जरी ही चिंता प्रबळ । प्रेमकुतूहल निःसीम ॥ १८३ ॥

साई जो सर्वांतर्ज्ञानी । तो काय नेणे भक्तांची छपवणी ॥
परी तयांचें कौतुक पाहुनी । बुध्याच जाणूनि मौन धरी ॥१८४ ॥

ब्रह्मानुभवें विराजमान । तयास भर्जरी अंगरखा भूषण ॥
निजशांतीनें शोभायमान । तया अलंकरण मुगुटाचें ॥ १८५ ॥

तरीही नानापरीचे सुरुचिर। बाबांस घालिती अलंकार ॥
कपाळीं टिळक मनोहर । रेखिती केशर मिश्रित ॥ १८६ ॥

हिरे मोतियांच्या माळा । कोणी तेथें घालिती गळां ॥
कोणी ललाटीं लाविती टिळा । चालवी लीळा भक्तांच्या ॥ १८७ ॥

शृंगार जेव्हां चढती समस्त । मस्तकीं जैं मुकुट विराजित ॥
मुक्ताहार कंठीं झळकत । दिसे अत्यद्भुत तैं शोभा ॥ १८८ ॥

नानासाहेब निमोणकर । धरीत बाबांवर छत्र पांडुर ॥
काठीं सवे तें वर्तुलाकार । फिरे झालर समवेत ॥ १८९ ॥

बापूसाहेब अति प्रीती । गुरुचरण प्रक्षालिती ॥
अर्घ्यपाद्यादि भावें अर्पिती । पूजा करिती यथोचित ॥ १९० ॥

पुढें ठेवून रौप्य ताम्हण । तयांत बाबांचे ठेवूनि चरण ॥
अत्यादरें करीत क्षाळण । करोद्वर्तन मागुतें ॥ १९१ ॥

घेऊनि केशराची वाटी । मग लावीत हस्तां उटी ॥
तांबूल अर्पीत करसंपुटीं । प्रसन्न दृष्टी साईची ॥ १९२ ॥

बाबा जंव गादीस बैसत । तात्याबादि उभेच ठाकत ॥
हातीं धरून बाबांस वसवित । आदरें नमित तच्चरणा ॥ १९३ ॥

निर्मळ चावडी भूमिका शुद्ध । घोटीव आणी स्फटिक बद्ध ॥
मिळणी मिळती आबाल वृद्ध । प्रेमें निबद्ध श्रीपदीं ॥ १९४ ॥

होतां गादीवर विराजमान । बसतां तक्यास टेकून ॥
चौरी चामर आंदोलन । वीजिती व्यजन दोबाजूं ॥ १९५ ॥

माधवराव तमाखू चुरिती । चिलीम तात्काळ तयार करिती ॥
देती तात्याबांचे हातीं । तात्याबा फुंकीती आरंभीं ॥ १९६ ॥

तमाखूची ज्वाला निघतां । तात्याबा देत बाबांचे हाता ॥
बाबांचा प्रथम झुरका संपतां । मग ती भगतास अर्पीत ॥१९७ ॥

मग ती चिलीम संपे तोंवर । इकडून तिकडे वर्तुलाकार ॥
भगत शामा तात्या बरोबर । वरचेवर भ्रमतसे ॥ १९८ ॥

धन्य ती निर्जीव वस्तू परी । काय तिचीया भाग्याची थोरी ॥
आम्हां सजीवां न तीची सरी । सेवा ती खरी तियेची ॥ १९९ ॥

तपश्चर्या ही महा कठिण । लाथां तुडविलें बाळकपण ॥
पुढें सोसून शीतोष्णतपन । अग्नींत ताऊन निघाली ॥ २०० ॥

भाग्यें बाबांचें करस्पर्शन । पुनश्च धुनीमाजी भर्जन ॥
मागुती गेरिका उटी चर्चन । सुख चुंबन तें लाधे ॥ २०१ ॥

असो कर्पूरकेशर चंदन । करिती उभयहस्तां विलेपन ॥
गळा सुमनमाळा घालून । गुच्छावघ्राणन करविती ॥ २०२ ॥

सदा जयाचें सुहास्यवदन । अति सप्रेम सदय अवलोकन ॥
तयास काय शृंगाराभिमान । राखिला हा मान भक्तांचा ॥ २०३ ॥

जयां अंगीं भक्तीचीं लेणीं । शृंगारिला जो शांती भूषणीं ॥
तया या लौकिकी माळामणी । अलंकरणीं काय होत ॥ २०४ ॥

कीं जो वैराग्याचा पुतळा । तयास किमर्थ पाचूंच्या माळा ॥
परी अर्पितां ओढवी गळा । भक्तांचा सोहळा पुरवी तो ॥ २०५ ॥

स्वर्ण पाचूं दिव्यहार । गळां विराजती मुक्तसर ॥
अष्टाष्ट शोडश जयांचे पदर । अभिनव पुष्कर मिश्रित ॥ २०६ ॥

जाई जुई तुळसी माळा । आपाद जयाचे रुळती गळां ॥
मुक्तकंठा कंठनाळा । मिरवी झळाळा अपूर्व ॥ २०७ ॥

सवे पाचूचा हेमहार । सुवर्ण पदक हृदयावर ॥
निढळीं शाम तिलक सुंदर । अति मधुर शोभा दे ॥ २०८ ॥

तयास काय म्हणावें फकीर । भासे सतेज वैष्णवप्रवर ॥
वरी डोलती छत्रचामर । शेला जरतार शिरिं शोभे ॥ २०९ ॥

बहुधा जोग प्रेमनिर्भरीं । मंगलवाद्यांचिया गजरीं ॥
पंचारत घेऊनि करीं । बाबांवरी ओवाळित ॥ २१० ॥

पंचोपचार पूजासमेत । घेऊनि पंचारत घवघवित ॥
नीरांजन कर्पूर वात । ओवाळीत बाबास ॥ २११ ॥

मग ही आरती जेव्हां संपत । एकेक एकेक सकळ भक्त ॥
बाबांस करोनि साष्टांग प्रणिपात । निघूनि जात घरोघर ॥ २१२ ॥

चिलीम अत्तर गुलाबपाणी । देऊनी बाबांची अनुज्ञा घेऊनी ॥
तात्याबा निघतां जावयां निजसदनीं । म्हणावे बाबांनीं सांभाळ मज ॥
जातोस जा परी रात्रीमाजी । मधून मधून खबर घे माझी ॥
बरें हो म्हणून मग तात्याजी । चावडी त्याजी जाई घरीं ॥ २१४ ॥
ऐसे लोक जातां समस्त । बाबा स्वहस्तें गाठोडें सोडीत ॥
धोतरांच्या घड्या पसरित । स्वहस्तें रचिती निज शेज ॥ २१५ ॥
सांठ पासष्ठ शुभ्र चादरी । घडिया मांडूनिया पुढारी ॥
स्वयें तयांच्या रचूनि हारी । पहुडती वरी मग बाबा ॥ २१६ ॥
ऐसीया चावडीची परी । इत्थंभूत झाली इथवरी ॥
आतां कथा जी राहिली दुसरी । अध्यायांतरीं वर्णिजेल ॥ २१७ ॥
तरी श्रोतां कीजे क्षमा । अगाध या साईचा महिमा ॥
संक्षिप्त वदतां राही न सीमा । गुरुत्वधर्मा पावे तो ॥ २१८ ॥
आतां साईची हंडीची कथा । आणीक ज्या ज्या राहिल्या वार्ता ॥
पुढील अध्यायीं कथीन समस्ता । सादर चित्ता असावें ॥ २१९ ॥
अखंड गुरुस्मरण स्वार्थ । तोच हेमाडा निज परमार्थ ॥
गुरु चरणाभिवंदनें कृतार्थ । चारीही पुरुषार्थ त्यापोटीं ॥ २२० ॥

स्वस्ति श्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाई समर्थ सच्चरिते । चावडीवर्णनं नाम
सप्तत्रिंशत्तमोध्यायः संपूर्णः ॥

श्रीसद्गुरू साईनाथार्पणमस्तु । शुभं भवतु ।

# श्री साईलीला

मासिक पुस्तक

वर्ष ३ रें. ] फाल्गुन शके १८४७ [ अंक १२ वा

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्॥



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

महात्म्यांचे अनुभव ... ... ... ... ४२३-४३२
स्फुट विषय ... ... ... ... ... २५७-२६४

## मासिकाच्या वर्गणीदारांस विनंति.

हें मासिक सुरू करण्यांत याच्या चालकाचा हेतू याची छपाई व खर्चेंपेच भागून राहिलेलें उत्पन्न श्रीसाईबाबांच्या एखादे फंडास जमा व्हावें असा असल्यामुळें, प्रत्येक वर्गणीदारानें मनांत आणल्यास आपापल्या स्नेह्यांमधून निदान एकतरी वर्गणीदार मिळविण्याचें श्रेय घेतल्यास एकंदरीनें कितीतरी मदत केल्यासारखें होणार आहे. शिवाय अशा रीतीनें मदत करणाऱ्यानें श्रीसाईसमर्थांची पर्यायानें सेवा केल्यासारखेंच होणार आहे.

यापुढें श्रीसाईलीलेचे अंक दर महिन्याचे पौर्णिमेपर्यंत पोष्टांत पडतील व ते ग्राहकांस दर महिन्यास वद्य १० पर्यंत पोहोंचले जातील अशी तजवीज ठेविली आहे. पोष्टांत क्वचित् अंक गहाळ होत असतील व यामुळें जर ग्राहकांनीं अंक न मिळाल्याची तक्रार पुढील महिन्याचे अमावास्येपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांना पुन्हा अंक पाठविण्यांत येईल.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खालीं सही करणार यांचे नांवानें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.

**गोविंद रघुनाथ दाभोळकर.**

श्रीसाईलीला ऑफिस, ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रे बी. बी. सी. आय्. रेल्वे.

## वर्गणीचे दर

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनीआर्डरनें अगाऊ रु. ३।=व्ही. पी. नें रु. ३॥. चालू अंक -।=. मागील अंक शिल्लक असल्यास -॥-.

## शुद्धाशुद्ध

वर्ष २ पौष १८४७ चा अंक १० वा. यांत पृ. ३०८ वर ५ रु. रा. रा. शिवराम गणेश गुप्ते यांचेकडून म्हणून जमा आहेत ते वास्तविक त्यांच स्वतःचे नसून श्रीराममारुती संस्थानमार्फत आलेले आहेत म्हणून समजावें.

या अंकांत स्फुट विषयाच्या शेवटच्या आठ पानांचे नंबर चुकीनें १५७ ते १६४ पडले आहेत त्याऐवजीं ते २५७ ते २६४ आहेत असें समजावें.

श्री क्षेत्र शिर्डी येथील साईबाबा यांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहवासाचा अनुभव. ([illegible])

सन १९०७ सालापासून संत दर्शनाची व त्यांचीं चरित्रें व गाणें ऐकण्याची उत्सुकता उत्पन्न झाली. प्रथम दर्शनलाभ मला फक्त श्रीसमर्थ नारायण महाराजाचा मु॥ मुलुंड जि॥ ठाणें येथें झाला. त्यापूर्वी मी आसनें प्राणायामादि प्रकार आचरीत होतो. यापुढे कांहीं दिवसांनीं श्री दासगणू यांचीं कीर्तनें ऐकण्याची सुसंधी वांद्रे मु. श्री. रा. गोविंदराव दाभोळकर यांचे घरीं मिळूं लागली. तेव्हां पासून प्राचिन संतांचे श्रेष्ठत्व अर्वाचीन देहधारी असलेल्या संतामध्ये अनुभवास येऊं लागलें. त्यानंतर फक्त प्रत्यक्ष संतदर्शनाची उत्सुकता वाढू लागली व अर्वाचीन कांहीं संतविभुतींचीं प्रत्यक्ष दर्शनें आपोआप होऊं लागलीं त्यापैकीं श्री. साईबाबायांचें एक दर्शन होय. ती हकीगत येणेंप्रमाणें:—

श्रीसद्गुरू नारायण महाराज यांचे शिष्य वृंदापैकीं एक माझे मित्र सिमला मुक्कामीं गव्हर्मेंट रेल्वे बोर्डमध्यें नोकरीस असणारे लाला मदनगोपाल यांनीं मु. केडगांव येथें आपलेबरोबर येण्याविषयीं वसई मुक्कामीं मला पत्र पाठविलें. त्यावेळीं मी वसई कोर्टमध्यें नोकरीस होतो. त्याप्रमाणें मी सात दिवसांची रजा घेऊन मि. मदन गोपाल यांच्या ठराविक व्यवस्थे प्रमाणें कल्याण मुक्कामीं त्यांना भेटून तेथून बरोबर जाण्याकरितां वसईहून निघालों. प्रथम मी विलेपार्लें येथें मदनगोपालचे बंधूकडे उतरलों. त्याच दिवशीं सायंकाळीं मदन गोपालचा सिमल्याहून टेलिग्राफ त्याचे बंधूस आला व केडगांवला जाण्याचा आजचा बेत कांहीं कारणानें रद्द केला आहे असें मि. "शंकरराव यांसही कळवावे असें लिहिलें होतें. मी तर येऊन पोहोंचलों व घेतलेली रजा कमी करून परत जाण्यापेक्षां येथेंच ७ दिवस काढावे असें ठरविलें. इतक्यांत माझे मित्र लाला लखमीचंद हे त्याच दिवशीं सायंकाळीं मला भेटले. तेही पारलें येथेंच रहात असत. त्यांनीं आपला स्वतःच शिर्डीला जाण्याचा इरादा दर्शविला व मला शिर्डीला आपले बरोबर येण्या

विषयीं सांगितलें. त्यातील मुख्य उद्देश हा की त्याना एकमेकांचे विचार एकमेकांस समजावून देणारा असा त्यांच्या ओळखीचा एक मित्र त्याना बरोबर असल्यास पाहिजे होता. मीही विचार केला की येथे ७ दिवस बसून राहण्यापेक्षा मि. लखमीचंद बरोबर जावें व त्याप्रमाणे जाण्याचें ठरविले. आम्हीं दोघेही नवशिकेच होतो. तेथें वागावयाचें कसें, स्टेशन पासून साईबाबाचे ठिकाण किती दूर आहे, टांगाभाडे वगैरे संबंधीं माहिती व बाबा संबंधीं नवीन इसमाला भीतिप्रद वाटणारी इतर लोकांनीं पसरलेली माहिती वगैरे संबंधीं मी विचार करीत होतो. कांहीं सर्व साधारण माहिती भाऊसाहेबांकडून मिळाली. त्यानीं एक करंड व मि. रघुनाथराव-बाद्य यानी एक हार बाबाना घालवयास दिला होता. व मि० कन्हैया लाल यांनीं बाबाना पेरू फार आवडतात म्हणून ८४ चार आणे मजजवळ पेरू घ्यावयास दिले होते. आम्ही दादर स्टेशनवर ( बी.बी. ) उतरून ( जी. आय् पी. ) दादर स्टेशनवर मनमाडचे गाडींत बसलों दादर स्टेशनवर कै. मि. "नानासाहेब चांदोरकर हे अचानक त्याच गाडीला कल्याणला जाण्या करितां म्हणून आले होते ते भेटले व त्यांनीं आमच्यांतला एक बोजा आपण घेऊन आमचें ओझे कल्याण पर्यंत कां होईना कमी करून पुन्हा कल्याणला आमचे कडे आणून दिला व आपला नमस्कार बाबांना प्रविष्ट करण्यास सांगितलें. येथून आम्ही दोघे जवळ जवळ सारी रात्र नाशीक पर्यंत भजन करीत होतों. मध्यंतरीं कसारा स्टेशनवर एक मुसलमान आमचे डब्यांत आला व आम्हीं त्याला शिर्डीची हकीगत विचारली. त्यानें तथ्यंभूत हकीगत आम्हास सांगितली व स्वतः मी शिर्डीला जात असतों असें तो म्हणाला. पुढें मनमाडला उतरून कोपरगांवचे गाडींत आम्हीं बसलो व सकाळीं ६ वाजतां स्टेशनवर उतरलों. त्यावेळीं टांगा स्टेशनवर नव्हता. इतक्यांत भाऊसाहेब यांच्या इसमांचा टांगा आला व आम्हीं भाऊसाहेबां कडूनच आलों असल्याबद्दल त्याला सांगितलें. टांगेवाल्याने आमचें सामान टांग्यांत घातलें व कोपरगांवांत आम्हीं दोन तास विश्रांती घेतली तेथें श्रीगोदावरीचें स्नान केलें, चहा घेतला. आम्हांला न्हावी पाहिजे होता तोहीं

तेथेंच आम्हीं रतरताक्षणींच मिळाला. पुढे. ८चे सुमारास शिर्डीला जाण्या-करतां टांग्यातून निघालो. प्रथम १०।१५ मिनटें घोडे चालेनात, न चालण्या इतके दुर्बळ ते नव्हते. कारण पारले येथील एक दोन इसमानी पेरू करिता पैसे दिले होते व ते पेरू या नदीच्या काठीच येणे होते हें यावेळीं आम्हीं विसरलों होतो. आमचा मूळचाच समज कीं ते खुद्द ठिकाणी मिळत असतील या धोरणाने पेरू विकत घेण्याचे बाबतींत आम्हीं निष्का-ळजी राहिलो. या दरम्यान एक पेरूवालीबाई धावूनच ओरडत आली व म्हणाली दादा तुम्हाला पेरू घ्यावयाचे आहेत ना थांबा हे घ्या. व माझेही थोडे बाबाना घ्या. हे कोडे काय आहे तें आम्हाला समजेना. आम्ही पेरू घेतले व करंडात घालताक्षणींच घोडयाचीही मस्ती थावली व जे पंधरा-मिनीटेपर्यंत चाबूक खाऊन सुद्धा चालत नव्हते ते पेरू आमचे पदरीं पडतां क्षणींचभर धाव निघाले व शिर्डीला पोहोंचेपर्यंत पुन्हां त्यानीं मार्गांत केव्हांही रती केली नाहीं.

आम्हीं साठे साहेबांच्या वाडयांत उतरलों त्यावेळीं १००।१५० मंडळी तेथें आली होती. मि. नूलकर व वांद्रे येथील मि. निळकंठराव सहस्त्रबुद्धे हेही तेथें होते. चहापान आटोपताच पुढें दर्शनास कसें काय जावें वगैरें संबंधीं मि. नूलकर यांना विचारलें. व मशीदीस गेलों. त्यावेळीं बाबा मशीदींत आजूबाजूचे लोकास शिव्यागाळी करीत होते. फक्त एक देशस्थ ब्राह्मण त्याचे पाठीमागे त्याची पाठ चेपीत होता. बाकी मंडळीची पळापळ होऊन ती मशीदीचे बाहेर बसली होती. इतक्यांत आम्हीं दोघे पेरू इतर हार वगैरे घेऊन तेथें थबकलों. तेथील प्रकार पाहून सर्वांनीं आम्हांस सांगितलें कीं तुम्ही वर जाऊं नका बाबा फार रागावले आहेत. तें ऐकून मि. लखमीचंद थोडा कचरला. परंतु मी मुळींच लक्ष न देतां एक-दम पायरीपर्यंत तडक गेलों. त्यावेळीं त्यांचे संबंधी (first impression) माझें प्रथम मत हे अक्कलकोटचे महाराजच आहेत असें जाहलें, व त्यांचा चेहरा मला तसाच वाटला.

तरी तशाच त्याच्या क्रुद्ध वृत्तीमध्यें ते असता मी पायरी जवळ दोन मिनिटें उभा होतो. त्याचे तामसी शब्द माझे कानावर पडतच होते. परंतु माझी ही वृत्ती कांहीं अंशीं तशीच झाल्याकारणानें त्याच्या इतर शिव्यागाळी काय होत्या त्या मला सांगता येणार नाहींत परंतु " जाव इदरसे " हे शब्द मी ऐकलें व त्यांचे पाठीमागे त्यावेळीं असलेला एक काळ्या वर्णाच्या देशस्थ ब्राह्मणानें याच वेळीं सांगितले की थोड्या वेळानें या व हातानें खुणावलें. मीहीं "पुन्हां बाबांनीं आपण होऊन हांक मारल्याशिवाय जाणार नाहीं " असा निश्चय करून पाठी फिरलों व मशिदीच्या भिंतीआड बसलों. व मि. लखमीचंदकडेही हीच करारी वाणी काढलीं. इतक्यांत "सद्गुरू माय प्रेमळच असते" हा अनुभव १।२ मिनिटांतच आला व प्रथम बाबांनीं आम्हा दोघांनाच बोलावण्याकरितां त्यांचे जवळील इसमास पाठविलें व तो खालीं उतरून आम्हांला बोलावण्यास आला व त्यासरसे मी व लखमीचंद एकदम बाबांचे पायापाशींच जाऊन बसलों. त्याबरोबर आजूबाजूनें शेंकडो लोक जमा झाले. नंतर हार घालणें, आरत्या करणें वगैरे प्रकार झाले. पेरू वगैरे बाहेर लोकांना वांटण्याकरितां बाबांनीं फेंकले व एक पेरू फोडून अर्धा मला व अर्धा लखमीचंद यांस दिला. उदी लावली व शेवटीं ' खाना खाव और वाडेमे आराम करो ' असा हुकूम केला. आम्हीं त्यादिवसापासून दोन तीन दिवस त्या वाड्यामध्येंच काढले. फक्त सकाळीं मशिदीमध्यें दर्शनाला जात असूं. व ७।८ चे सुमारास बहिर्विधीला बाबा जात असतां त्यांचें रोज दर्शन होतच असे पुढें २-३ दिवसांत मुंबईची मंडळी जाऊं लागली व शेवटीं ३रे ४ थे दिवशीं फक्त कॅ० वा० रा.राजूलकर रा. रा. सहस्रबुद्धे व आम्ही दोघे एवढेच वाड्यांत राहिलों मि.सहस्त्रबुद्धे यानीं त्यावेळीं जरी पूर्ण नाहीं तरी पूर्वीच्या आचार विचारांत इकडे येण्यानें बराच फेरफार होण्याइतका परिणाम आपणावर झाला असें कबूल केलें,

आम्हीं दोनतीन दिवस ' पुखा ' झोडीतच तेथें बसलों होतों, परंतु माझे विचारतरंग फार निराळेच चालत. मी म्हणे " हे जर सत्पुरुष आहेत तर लोकांना शिव्या देणें, क्रोध करणे वगैरे महातामसी प्रकार यांचे

चालू आहेत. तर अशा वृत्तीनें लोकांचें काय कल्याण होणार आहे ? व जगाचे कल्याणाला याचा काय उपयोग होणार ! मी तर येथें विनाकारण आलों यांचेपासून जर कांहीं सदुपदेश वगैरे होत नाहीं तर येथें रहावयाचें कशाला ? हे तर " खाना खाव और आराम करो" याशिवाय कांहींच सांगत नाहींत.

वरील विचार २।३ दिवस सारखे चालत असत. इतक्यांत मुंबईची सर्व मंडळी निघून गेलीं. ३ रे ४ थे दिवशीं सकाळीं ७।८ वाजतां विहिरीवर स्नान करून चहा घेऊन मि. नूलकरांबरोबर गप्पा मारीत बसलों इतक्यांत नूलकर वाडयाच्या माडीवर निघून गेले. पुढे २।३ मिनिटांत उदाचा घमघमाट येऊं लागला व तो कोठून येतो तो मी पाहूं लागलो. वाडयात ऊद कोणीही पेटविला नव्हता. इतक्यांत लक्ष्मीचंद व मी मशीदींत बाबाकडे जाण्याचे ठरविले व उठलोही व दरवाज्याच्या बाहेर पडलों तरी उदाचा वास मशिदी पासून सारखा येतच होता व तो आम्ही तेथे पोहोंचताच थांबला. प्रत्यक्ष मशिदींत सुद्धां कोणीही ऊद पेटविला नव्हता. तेव्हां आमची खात्री झाली कीं हा एक बाबांचा जासूदच आहे. व आम्हीं तेथें यावें याबद्दल हे त्यांचें प्रसाद खुणेचे बोलावणेच आहे. तेथें बसल्यावर आम्हां दोघांना दोन पाय चेपावयास बाबानीं सांगितले मी उजवीकडे बसलो व तो डावीकडे बसला होता. तेवढयांत चिलमी आणावयास एका इसमास बाबांनीं सांगितली. त्यांनी ती प्रथम ओढून माझ्या हातांत दिली, पुन्हां ओढून लखमीचंद याला दिली. त्यानें याप्रमाणें तीन वेळ ओढली. मी नुसती हातांतच धरलीं माझा समज हा कीं त्यांनी ती कांहीं मला ओढावयास दिली नसून थोडया विश्रांती खातर मजजवळ दिली आहे.' व ती ओढावी अशी त्यांची इच्छा असल्यास ते मला सांगतील तेव्हां ओढीन. तेथपर्यंत मी कांहीं साईबाबा नाहीं किंवा त्यांचे बरोबरीचा नाहीं कीं मी ओढलेली त्यांनीं ओढावी हें करणें अपमानास्पद आहे असा माझा ग्रह झाला. लखमीचंद तर ओढीतच होता. वरील विचार येतांच बाबांनीं आपण ओढून

'लेव' म्हणून मला दिली त्याबरोबर मी तिला झुरका दिला व पुन्हा दोन वेळ देऊन चिलीम बदलली चिलीम ओढण्याचे वेळात स्वत:शीच बाबांचें बोलणे चाललेले होते त्यातील मजकूर काहीं लक्ष्मीचंद संबंधी होता व काही मजविषयीं होता. त्यांनी माझे आजोबांचे वेळेपासून त्या तारखे पर्यंतचा साग्र इतिहासाचा पाडा गाईला. त्यातून पुष्कळ गोष्टी मला माहीत नव्हत्या त्या मी घरीं आल्यावर खऱ्या ठरल्या व काहीं मला माहीत होत्या त्या बद्दल मला आश्चर्य वाटले आमचे आजोबाचे गुरू १२ वर्षे आमचे घरीं होते त्याबद्दल त्यांनीं उल्लेखही केला तो असा:—

**मेरा बाप और मा था. हम१२ बरस उसके पास रहे. उसने मेरा पालन बहोत अच्छा तऱ्हेसे किया मेरा मा बापकू बहुत आदमीनें आप्तइष्ट सोयरेनें सता दिया. उसका कुछ कमती हुवा क्या? ओ मेरे पास है, हमाराबी कुच कमती हुवाक्या ? जिसनें उसकू सता दिया उसका अल्ला देखते हैं देखो, अच्छा तऱ्हसे चलो अल्ला अच्छा करता है, बुरा तेऱ्हेसें चलेंगे तो बुरा होता है. हम गाणगापूरमेबी है, पंढरपुर मे बी है सब ठिकाणमें है, सब जगमे हम है और हमारे पास सबजग है. जिसकु तुम पकडा है उसकू छोडना नहीं. दो चार दिनसे अल्ला पावेगे**

याप्रमाणे पुष्कळच भाषण होऊन उदी घेऊन त्यांनीं माझ्या सर्व तोंडावर फासली व **खाना खावो और आराम करो** असे सांगून खोबऱ्याचा प्रसाद देऊन आम्हाला जेवण्यास पाठविलें. त्याच दिवशीं आम्हाला मुंबईत यावयास निघणे होते व त्यानीं परवानगी दिलीही. आम्ही लगेच वाड्यात आलों जेवण उरकले व बांधाबांध केली, आम्हाला ३॥ वाजता निघणें जरूर होतें. पैसे सर्व खलास झाले होते. कै. वा. नूलकरांकडून मी पाच रुपये उसने घेतले त्यांतूनही दुसरा किरकोळ खर्च वजा जातां १॥ रुपया शिल्लक राहिला. सदहू शिल्लकेमध्ये वसईस येणे शक्य नव्हतें. पुन्हा आणखी रक्कम मागण्याचीही आम्हांस लाज वाटली,

मला दुसरे दिवशीं ११ वाजता ड्यूटीवर हजर राहणें जरूर होतें. तीन वाजले, शिवाय टांगा नाहीं, पैसा नाहीं जा म्हणून हुकूम झालेला. तेव्हा २।। चे सुमारास Parting station पुन्हां भेटून जावें म्हणून दोन नारळ घेऊन दर्शनास गेलो त्यावेळीं बाबाचें भोजन संपलें होतें, बाबानीं उदी व नारळ प्रसाद दिला व तुमकू कल ऑफीसमें जानेका है अभीकेअभी निकलो तो गाडी मिल जायेगी असे उद्गार काढले. इतक्यांत एक इंदूरहून इसम एकटाच बाबांना भेटावयास आला त्याचा स्वतंत्र टांगा होता व येता जाता २ रुपये ठरले होते त्याला बाबानीं आमचेबरोबर जाण्यास हुकूम केला. आमचे टांग्याचे काम झालें आम्हीं स्टेशनवर पोहोचतांच सायंकाळची गाडी चुकली. त्यामुळे रात्रीं मेल्ला आम्हाला यावें लागले. आम्हीं कोपरगावाहून ८।८।। चे गाडीने मेलचीच तिकिटे काढून मनमाडला आलों. तों असें समजले कीं मेल भुसावळला कांहीं डिरेंजमेंट झाल्यामुळे तीन तास लेट झाली आहे. झालें दुसरे दिवसाचा ११ वाजण्याचा ऑफीसचा वेळ गाडीमध्येच गेला. मेल सकाळीं ६।७ ला यावयाची ती १२ वाजतां दादरला आली लखमीचन्द ३।४ वाजताच ऑफीसला गेला व मी त्या इंदूरच्या मित्राबरोबर सायनला येऊन स्नान वगैरे करून भोजन उरकून स्वस्थ पाच वाजतां वांद्रे मुकामीं आलो व दुसरे दिवशीं ऑफीसला गेलो. सदर्हु मित्र हा माझा एल्फिस्टन हायस्कुलमधील सहाध्यायी होता. व शिर्डीपासून मुंबईस येण्यापर्यंतचा आमचा सर्व खर्च त्यानेंच केला. त्याचें घरदार सायन मुकामीं आहे व तो पुना प्रसिद्ध दळवी फामिलींतील असून बॉबे कस्टममध्यें नोकरीस असतो. त्यांचे घरीं गेल्यावर त्यांचे वृद्ध आजा आजी यांना मी हकीगत सांगितली. व केडगावचे नारायण महाराजांचेकडे गेले होते असें मला त्याचवेळीं त्यांचे कडून समजलें. एकंदरींत १।। रुपयाचे शिलकेंत मोठ्या ऐषआरामामध्यें आम्ही मुंबईस आलो. इकडे वसईकोर्टमध्ये एक नाझर होते. त्याचे व आमचें फारच जुळत असे. कारण त्यांची दिशा व माझी दिशा हीं काठीच्या दोन टोंकाप्रमाणें होतीं. सदर्हु नाझरनी Over time ची परवानगी एक दिवस गैरहजर म्हणून कायद्याचीं पानें चाळून त्यावे

कळवे सबजज्ज मि. कुपर याचे कान भरले तदर्हू इसम ७ दिवसाचे रजेवर गेला असून आज हजर होणे असता गैरहजर राहिला आहे. तो बेपरवा आहे वगैरे वगैरे बऱ्याच गोष्टी सांगून त्याने सबजज्जाचे कान फुकले. मी आदले दिवशीं वसईस मायकार्ळी पोचल्यावर ही हकीगत मला समजली व गावातही Overtime म्हणून जास्त दिवस गैरहजर राहिल्याबद्दल मागची नोकरी मोफत जाऊन नवी विटी नवा दाडू म्हणून नवीन आरंभ करावा लागेल अशा बऱ्याच गप्पा पसरल्या. मी तर बेफिकीरच होतो; परंतु सबजज्ज याना माझा स्वभाव माहीत असल्यामुळे त्यानीं त्याकडे मुळीच लक्ष दिले नाहीं दुसरे दिवशीं ११ वाजता मी ऑफिसमध्ये जाताच आमची सावत्र सासू हजरच होती ती माझेबरोबरच चेंबरमध्ये आली. सबजज्जानीं काल का आला नाहीं म्हणून विचारलें मी एकदर सर्व हकीगत सांगितली. त्यानीं तावडतोब १ दिवसाची एक्स्टेन्शन ग्रांट केली. धाकटी सासुबाई शरमली व तिची थोडी गावातील लोकानीं फजितीही केली.

एकंदरींत "राजा चाले तेथे वैभव सागाती" या तुकारामच्या उक्तीप्रमाणें प्रत्येक सताकडे चमत्कार असतातच परंतु चमत्काराच्या दृष्टीनेच संतांची ओळख व पारख करणाराना त्याचेपासून खरा आत्मिक उन्नतीचा लाभ फारसा मिळत नाहीं, असा माझा अनुभव आहे. चमत्कार हे केव्हां केव्हा कांहीं जनांना सन्मार्गाला लावण्यास कारणीभूत होतात हीही गोष्ट सत्य आहे परतु अशानीं आपले धोरण कोणते ठेवावे हेही त्यांनीं संतसहवासावरून जाणले पाहिजे.

## ।। श्री साईनाथबाबा प्रसन्न ।।

ह. भ. प. रा. रा. रा. गोविंदराव रघुनाथराव दाभोलकर यांसः— मी आपला स्वतःचा अनुभव पाठवित आहें तो आपण सवडीनुसार श्री साईलीले मध्ये छापून प्रसिद्ध कराल अशी नम्र विनंती आहे कळावें.

आपला दास व बाबांचा दासानुदास **शंकर गणपत शिंदे**

माझ माउस भाऊ रा. रा. घोडीबा फरताळे याच्या घरीं श्री साईनाथ बाबाची पूजा होती. तेंव्हां आमच्या माउस भावानें आज आमच्याकडे श्रीसाईबाबाची पूजा आहे तेंव्हा तुम्ही आज भजनास या असें सांगितलें. तेव्हा मी १० वाजतां भजनास गेलो व गुरुवारीं गुरुमूर्ती रा. रा. काशिनाथ मामा डुबे यांच्या बरोबर बरीच मंडळी भजनास आली होती व दुसऱ्या दिवशीं मी रा. रा. काशिनाथ मामाकडून श्रीसाईनाथ बाबांचा फोटो घेऊन पूजा करू लागलो. ८-९ माहिने पूजा केली. व पुढें पुजा करण्याचे सुटलें व पुढे २ वर्षांनीं मुंबईस शिवरात्रीच्या दिवशीं घोटा घेण्यात आल्यामुळे मला फार त्रास होऊन माझ्या मनावर वाईट परिणाम झाला. एक प्रकारें डोकें विचारानें भडकूं लागलें. पुढें ६ महिने पर्यंत तो विचार म्हणजे एक प्रकारची भीति वाटूं लागली व आम्ही पुष्कळ डॅाक्टर याचे उपाय केले परंतु काहीं गुण आला नाहीं. पुढें विचाराचा फार त्रास होऊन माझें डोकें फार भडकूं लागले आमच्या आईने म्हणावे कीं याला वेड लागले. कोणीं म्हण याला भूत लागलें. हजारो कल्पना निघूं लागल्या. पुढें माझी आई इतकी त्रासून गेली कीं आतां काय करावें, जेवणास बसलों कीं तो विचार मनात येई व जीव घाबरा होई. मला विचित्र भावना होऊं लागल्या. माझे मित्र. रा. रा. परब यानीं मला असें सांगितलें कीं तुला असा त्रास होत असतो तर ज्या देवावर तुझी भक्ती असेल त्या देवाची पूजा कर म्हणजे हे सर्व तुझें जाईल व रात्रीं मी श्रीसाईबाबांची आठवण करूं लागलों. २—३ दिवसांनीं बाबांची पूजा केली व पुढें बाबांनी दृष्टांत दिला. बाबा भिक्षेस निघालेले आहेत व मी त्यांच्याकडे सारखा

पाहात आहे. बाबा मला म्हणतात बेटा, कूच मत डरो मैं हूं. असे शब्द बाबा बोलले व सकाळीं आईस रात्रीचें स्वप्न सांगितले तेव्हा आई म्हणाली कीं पूर्वी बाबाची पूजा करीत होतास व मध्ये सोडून दिलीस त्याचा हा प्रताप आहे, तरी अजून तू आपली पूजा करूं लाग म्हणजे बाबा सर्व तुझें डोकें ठिकाणावर आणतील. मी पूजा करू लागलो व गुरुवारीं गुरुमूर्ती रा. रा. काशिनाथ मामा डुबे याच्याकडे गेलो व मामांस म्हणालो कीं मी आज तुमच्याकडे भजनास येणार आहे. तेव्हा मामांनीं विचारलें कीं तूं तर सर्वच सोडून दिले आहेस आणि मग तूं आज कसा भजनास येणार ? तेव्हा मी आपला श्री साईबाबांबद्दल अनुभव सांगितला. मला एक प्रकारें विचाराने त्रास होत असतो व २ दिवस झाले. मी बाबाची पूजा केली आहे व मी आडमार्गी गेलों होतो. तेव्हा बाबांनी मला त्रासांतून बाचविले आहे व बाबांच्या उदीपासून पुढे मला चांगलें बरें वाटूं लागले व पुढे तो विचार मनात आला कीं मी श्रीसाईबाबांस मोठ्याने हाका मारीत असे. तोच ताबडतोब विचार निघून जाऊन मला बरें वाटे. मी. रा. रा. काशिनाथ मामा डुबे याच्याकडून श्रीसाईबाबांची उदी आणली व पूजा करून लावीत असे. पुढे २ महिन्यानीं माझा विचार कमी होत गेल्यामुळें मला बरें वाटूं लागले व पुढे मी श्रीसाईबाबांचे समाधीचे दर्शन घेतलें व बाबाचे अनुभव पावलोपावलीं येत आहेत. मी. श्रीसाईबाबास पाहिलें नाहीं तरी जगामध्ये श्रीसाईबाबांचे अनुभव पावलो पावलीं येत आहेत. कारण बाबाच्या आरतींत म्हटलें आहे कीं ( नास्तिकांनाही तूं लाविसी निज भजनी दाविसी नाना लीळा असंख्यरूपांनीं ) हें बरोबर पटत आहे.

गेल्या पुण्यतिथीला व गुरुपौर्णिमेच्या उत्सवात प्रसिद्ध भजनकार रा. रा. विठ्ठलराव बाळकृष्ण कल्याणपूरकर यांनीं रा. रा. दाजी विठ्ठल सांबारे यांच्या येथे केलेले प्रवचन व पुराण.

## ॥ मंगलाचरणम् ॥

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् ।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादि लक्ष्यम् ।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधी साक्षिभूतम् ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥ १ ॥

प्रथम नमन माझें, सद्गुरू साईनाथा ।
हरुनि दुरित माझें, मागतों हेंचि आतां ।
अशिव कलि मला तो, गांजितो नित्य नाथा ।
तुजविण नच त्राता, दीन या कृष्णनाथा ॥ २ ॥

गळा रुंडमाळा, करीं वाम झोळी ।
मला वाटतें कीं, असे चंद्रमौळी ।
नका अंत पाहूं, तुम्ही साइनाथा ।
दावी मुमुक्षु पथ हा, मज कृष्णनाथा ॥ ३ ॥

हे चालिलें वय वृथा, भुललों प्रपंचीं ।
तीं ही करोनि स्थिरता न घडे मनाची ।
दुःखार्णवांत बुडतों, मज तारि आतां ।
नमस्कार माझा, सद्गुरू साईनाथा ॥ ४ ॥

## ॥ ध्यानपर ॥

### ॥ श्लोक ॥

श्रीसाई यत्प्रसादें, रमणिय अशि ही मूर्ति सन्मूख ठेली ।
वाटे पश्चीम देशीं, स्वमठ करुनियां, देवता स्थापियेली ॥